वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार- शुक्रवार दि.३१ ऑक्टोबर २०२५ पाने ४ किंमत ३

# डॉ.संपदा मुंडे प्रकरणात सुध्दा राजकारण करायचे का?

## तुम्ही गुंड पाळता ? ;तुमच्या यंत्रणेवर तुमचा भरोसा नाही-खा.बजरंग सोनवणे



Email.- dailydivyawarta@Gmail.com Email.-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

बीड , (दिव्य न्युज):- मूळ बीड जिल्ह्यातील कन्या असलेल्या फलटणमधील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणातील पीडित कुटुंबीयांची बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी सांत्वनपर भेट घेतली. त्यानंतर, सोनवणे यांनी पत्रकार परिषद घेत, आपण याप्रकरणी शांत बसणार नसल्याचे स्पष्ट केले. याप्रकरणाचा तपास केंद्रीय तपास यंत्रणांनी करावा, यासाठी प्रयत्नशील असल्याचेही बजरंग सोनवणे यांनी म्हटलं. तसेच, महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, आमदार धनंजय मुंडे यांच्यासह मंत्री पंकजा मुंडेंवरही खासदार सोनवणेंनी टीका केली. ▸▸ पान २ वर

### सोनवणेंचा रुपाली चाकणकरांवर निशाणा

इतर प्रकरणात चाकणकर ताई प्रेस घेताना दिसल्या नाहीत. त्यांचा चकार शब्द देखील नाही, असे सोनवणे यांनी म्हटलं. तसेच, ही हत्या की आत्महत्या याची सखोल चौकशी झाली पाहिजे. आत्महत्या केली असेल तर कोण कारणीभूत आहे? सध्या मयताच्या टाळूवरचे लोणी खाण्याचे काम सुरू आहे. याप्रकरणी, मी हॉस्पिटलचे डीन, पोलिस आणि लोकप्रतिनिधी यांना भेटून जाब विचारणार, असेही सोनवणे यांनी सांगितले.

### धनंजय मुंडेंना यातही राजकारण दिसतं का?

केंद्राच्या यंत्रणेकडे हा तपास द्यावा यासाठी मी प्रयत्न करणार आहे. तिथल्या पोलिसांकडे तपास दिला तर न्याय कधी मिळणार? असा सवाल सोनवणे यांनी उपस्थित केला. तुम्हाला यात देखील राजकारण करायचे आहे का? तुम्ही गुंड पाळले त्याचा रोख नेमका कुणाकडे होता हे माहित नाही. उलट तुम्हीच जिल्ह्याची बदनामी केली, त्यामुळे त्यांनी असं बोलू नये, असे म्हणत सोनवणे यांनी धनंजय मुंडेंवर पलटवार केला.

# पोटच्या गोळ्यासाठी बाप व्याकूळ

## यश ढाका खुन प्रकरणी बापाचे धरणे आंदोलन

### गणेश शिराळेला आरोपी करून अटक करण्याची मागणी



बीड ,(दिव्य न्युज):- पत्रकार पुत्र यश ढाका या तरुणाचे भररस्त्यात चाकूने भोसकून खून करण्यात आले. या प्रकरणी अद्याप आरोपी फरार असून, त्यांना तात्काळ अटक करावी यासह विविध मागण्यासाठी मनसे महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षा जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली मनसेच्या वतीने आज शुक्रवारी (दि.३१) पोलीस अधीक्षक कार्यालय समोर धरणे आंदोलन करण्यात आले. शहरातील पत्रकार देवेंद्र ढाका यांचा मुलगा यश ढाका याचे शहरातील गजबजलेल्या माने कॉम्प्लेक्स भागात भररस्त्यात काहींनी निर्दयीपणे खून केला. या घटनेने जिल्ह्यात खळबळ उडाली होती. याप्रकरणी काही आरोपी अटक केली पण काही आरोपी अद्याप फरारा असून, त्यांना ▸▸ पान २ वर

# धूम-स्टाईल चैन स्नॅचिंग करणारे दोघे चोरटे गजाआड

### स्पोर्ट बाईकसह सोन्याचे दागिने जप्त



बीड ,(दिव्य न्युज):- परळी आणि माजलगाव शहरात धूम-स्टाईलने महिलांच्या गळ्यातील सोन्याच्या चैन हिसकावणाऱ्या दोन अट्टल चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ३० ऑक्टोबर रोजी परळीत सापळा रचून अटक केली. त्यांच्या ताब्यातून सोन्याचे दागिने आणि स्पोर्ट बाईक असा एकूण २ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त झाला आहे.

माजलगाव शहर आणि परळी शहर पोलिस ठाण्यात महिलांच्या गळ्यातून चैन ▸▸ पान २ वर

# रूपाली पाटील ठोंबरेंच्या विरोधात पोस्ट टाकली म्हणून महिलेस अमानुष मारहाण

## व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल



पुणे,(दिव्य न्युज):- राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नेत्या रूपाली ठोंबरे पाटील यांनी गुंड पाठवून एका महिलेला मारहाण करण्यात आल्याचा दावा एका महिलेने केला आहे, याबाबतचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. गुंड पाठवून अमानुषपणे मारहाण केल्याचा आरोप या महिलेने केला आहे. मारहाणीनंतर ही महिला रक्तबंबाळ झाल्याचं दिसून येत आहे. रूपाली ठोंबरे पाटील यांच्या विरोधात पोस्ट केल्याने मारहाण केल्याचा आरोप त्या महिलेने केला आहे. मारहाण झालेल्या माधवी खंडाळकर यांनी हे गंभीर आरोप केले आहेत.

रूपाली पाटील आणि तिची बहीण, मावशी, मैत्रीण कोण ती मला माहिती नाही आणि तिचा भाऊ सगळेजण इथे मला मारहाण करत आहेत. माझ्या घरात घुसून त्यांनी मला मारहाण केली, केवळ मी काल एक पोस्ट केली होती, माझं वैयक्तिक मत लोकशाही म्हणून मांडलं होतं. त्यामुळे लवकरात लवकर हा व्हिडिओ सगळीकडे शेअर करा, हे सगळ रूपाली पाटील यांनी ▸▸ पान २ वर

# कदम डेअरी फार्ममधून १ लाख ३२ हजारांची रोकड लंपास

बीड,(दिव्य न्युज):- कुमशी येथील कदम डेअरी फार्ममधून तब्बल १ लाख ३२ हजार रुपये चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी डेअरी मालक रविंद्र कोंडीराम कदम (वय ४४, रा. जिजाऊ नगर, जुना धानोरा रोड, बीड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संतोष खराबे आणि त्याचे दोन अज्ञात साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना दि. २८ ऑक्टोबर २०२५ रोजी मध्यरात्री सुमारास (१.३० वाजता) कुमशी येथील कदम डेअरी फार्म येथे घडली. फिर्यादी यांच्याकडे म्हशींसाठी खुराक आणण्याचे काम संतोष खराबे हा कामगार पाहत होता. त्याने दोन अज्ञात साथीदारांना बोलावून घेतले व तिघांनी मिळून डेअरीतील रोख रक्कम चोरून नेली. या चोरीत ५०० रुपयांच्या २६४ नोटा, एकूण १ लाख ३२ ▸▸ पान २ वर

# मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' चे पैसे मिळाले नाही

## रोहित आर्यच्या एन्काउंटरवर केसरकर यांचा दावा

मुंबई,(दिव्य न्युज):- राज्य सरकारने योजनेचे पैसे थकवले म्हणून रोहित आर्य याने मुंबई पवईमध्ये १७ मुलांना डांबून ठेवले. पोलिसांशी झालेल्या चकमकीत त्याचा मृत्यू झाला. शालेय शिक्षण विभागाच्या 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' योजनेचे काम करूनही पैसे मिळत नसल्याचे रोहित आर्य याचे म्हणणे होते. या सगळ्यावर तत्कालिन शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर ▸▸ पान २ वर



## फडणवीसांच्या खात्याबाबत अजितदादांच्या खात्याकडे तक्रार

# रुपाली चाकणकर चौकशी करणार ?

मुंबई ,(दिव्य न्युज):- महिलांवरील अन्याय-अत्याचार रोखण्यासाठी महिला आयोगाने कसून प्रयत्न करण्याची गरज सद्यस्थितीत दिसते आहे. कायद्याने बंदी असूनही बालविवाहाची प्रकरणे समोर येतात. अशाच एका प्रकरणात अकोले पोलिसांबाबत गंभीर आरोप करत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृहखातं आहे. याच खात्याची तक्रार अजित पवार यांच्या शिलेदार रुपली चाकणकर संभाळत असलेल्या महिला आयोगाकडे केली आहे. या तक्रारीची कितपत दखल महिला आयोग घेईल? पोलिसांची चौकशी होईल का? देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असलेल्या या खात्याची चौकशी करण्याची हिंमत महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर दाखवणार का? असे प्रश्न चर्चेत आहेत.सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी व श्रीनिवास रेणुकादास यांनी बालविवाह प्रकरणात पोलिसांचीच तक्रार दिली आहे. त्यांनी दिलेल्या ▸▸ पान २ वर



# बीड नगरपरिषद निवडणुकीत प्रभात क्र २ मधुन समीर तांबोळी यांच्या उमेदवारीची मागणी जोरात



बीड ,(दिव्य न्युज):- आगामी बीड नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक २ मधून समीर तांबोळी यांची उमेदवारी जाहीर करावी,अशी जनतेकडून जोरदार मागणी होत आहे. स्थानिक नागरिक, व्यापारी आणि युवक वर्गाने एकत्र येऊन समीर तांबोळी यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला आहे. समीर तांबोळी यांनी यापूर्वी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्यामुळे परिसरात त्यांची चांगली ओळख निर्माण झाली आहे. नागरिकांचे अनेक प्रश्न हाताळून त्यांनी स्थानिकांमध्ये आपली लोकप्रियता वाढवली आहे. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत त्यांना उमेदवारी द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे. या जनसमर्थनामुळे प्रभाग क्रमांक २ मध्ये निवडणूक रंगतदार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. लवकरच समीर तांबोळी हे आपल्या निवडणुकीबाबत अधिकृत भूमिका जाहीर करतील, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे.

## अवकाळी पावसामुळे ऊसतोडणी ठप्प

# 'कोयता थांबला, हंगाम लांबला'



बीड, (दिव्य न्युज):- दिवाळीनंतर राज्यभरातील अनेक साखर कारखान्यांचा धुरळा पेटून गळीत हंगामाला सुरुवात झाली होती. गावागावातून ऊसतोडणी मजुरांच्या टोळ्या दाखल होऊन शेतांमध्ये कामाला सुरुवात झाली होती. मात्र, विश्रांती घेतलेल्या अवकाळी पावसाने अचानक जोरदार हजेरी लावताच कोयता थांबला, हंगाम लांबला अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

गेल्या पाच दिवसांपासून सलग अवकाळी पाऊस बरसत असून, सकाळी ऊन आणि दुपारी पाऊस अशा वातावरणामुळे शेतात पाणी साचले आहे. ऊस भिजल्याने तोडणी थांबवावी लागली असून, याचा थेट परिणाम साखर गाळप हंगामावर झाला आहे. हंगाम लांबणीवर पडण्याची शक्यता शेतकरी आणि कारखानदार या दोघांनाही चिंतेत टाकणारी आहे. चार ▸▸ पान २ वर

# दिवसाढवळ्या धाडसी चोरी

### ट्रॅव्हल्सवरील १२ बॅगा लंपास-३० हजारांची रोकड गायब

बीड,(दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यात गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असतानाच, आज गुरुवारी सकाळी आणखी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर चौसाळा ते पारगाव टोल नाका परिसरात सकाळी आठच्या सुमारास तिघा चोरट्यांनी दिवसाढवळ्या ट्रॅव्हल्स गाडीवरून तब्बल १२ बॅगा लंपास केल्या.

मिळालेल्या माहितीनुसार, ही मिनी ट्रॅव्हल्स गाडी चौसाळा फाट्याकडून पारगावकडे जात असताना दुचाकीवरून आलेल्या तिघांनी गाडीवरील बॅगा एक-एक करून रस्त्याच्या कडेने फेकायला सुरुवात केली.काही क्षणातच त्यांनी त्या बॅगा उचलून दुचाकीवर बसत पळ काढला.चोरी गेलेल्या बॅगांपैकी एका बॅगमध्ये तब्बल ३० हजार रुपयांची रोकड असल्याचे चालकाने सांगितले. या घटनेनंतर परिसरात काही वेळासाठी एकच खळबळ उडाली असून, घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आहे.

दरम्यान, पाली (ता. बीड) येथे मध्यरात्री कॅनरा बँक फोडण्याची घटना घडून नुकतीच चौकशी सुरू असतानाच, दिवसाढवळ्या घडलेल्या या चोरीमुळे पोलिसांच्या गस्त व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.पोलिसांकडून चोरट्यांचा शोध घेण्यासाठी आसपासच्या सीसीटीव्ही फुटेजचा तपास सुरू असून, या घटनेने महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# बोगस कॉल सेंटर प्रकरणाची ट्रम्प सरकारने घेतली दखल

## अमेरिकन एफबीआयचा मेल, ॲम्बेसीचाही गृहमंत्रालयाचा फोन, राष्ट्रीय सुरक्षेला धोका पोहोचविणारे ऑर्गनाईज्ड सिंडिकेट उघड

औरंगाबाद, (दिव्य न्युज):- चिकलठाणा एमआयडीसीत बोगस कॉल सेंटर सुरू करून अमेरिकेतील नागरिकांना टॅक्स चोरीच्या प्रकरणात कारवाईची भीती फारुख ऊर्फ घालून दररोज फारुकी कोट्यवधींचा गंडा घालणाऱ्या रॅकेटचा एमआयडीसी सिडको पोलिसांनी मंगळवारी पर्दाफाश केला होता. सहा प्रमुख आरोपींसह ११४ जणांना अटक केली. मात्र, कारवाईची भनक लागताच मास्टरमाइंड अब्दुल फारूख मुकदम शाह ऊर्फ फारूखी शहरातून पसार झाला होता. पोलिसांनी त्याचा मोबाईल ट्रेस करत गोवा पोलिसांच्या मदतीने ताब्यात घेतले.पोलिस बुधवारी रात्री उशिरा फारुकीला घेऊन शहरात दाखल झाले. दरम्यान, फारुकीला कॉल सेंटरचा सेटअप उभारणीसाठी शेकडो संगणक, लॅपटॉप, मोबाईल, इमारत भाडे, आलिशान गाड्या अशी कोट्यवधींची फॉरेन फंडिंग झाल्याचा संशय बळावला आहे.

अधिक माहितीनुसार, भावेश प्रकाश चौधरी (३४, रा. अहमदाबाद), भाविक शिवदेव पटेल (२७, रा. मुंबई), सतीश शंकर लाडे (३५, रा. अहमदाबाद), वलय पराग व्यास (३३, रा. अहमदाबाद), अजय ठाकूर, मनोवर्धन चौधरी याना मंगळवारी अटक केल्यानंतर बुधवारी भाविकला पोलिसांनी पुन्हा घटनास्थळी आणून कार्यपद्धती समजून घेतली. अमेरिकेतील नागरिकांना टॅक्स चोरी, लोन फॉडमध्ये नाव आल्याची भीती घालून त्यांच्याकडून गिफ्ट कार्डच्या माध्यमातून कोड रिडिम करून डॉलरची रक्कम बिटकॉइन आणि त्यानंतर रुपयात रूपांतरित करून लूट केली जात होती. याचा प्रमुख जॉन नामक व्यक्ती व्हर्टूअली टोळीशी जोडलेला होता.

फारुकी कॉल सेंटर सुरू करून नॉर्थ ईस्ट भागातील तरुण तरुणींना कॉल सेंटरमध्ये नोकरीची आमिष दाखवून दिल्ली मार्गे शहरात घेऊन आला. अनेक तरुण तरुणी यापूर्वी वेगवेगळ्या ठिकाणी फ्रॉड कॉल सेंटरवर काम करून इकडे आलेले आहे. त्यामुळे ज्यांना अनुभव नाही अशांना अमेरिकन लोकांना इंग्लिशमध्ये कसा संवाद साधायचा याची स्पेशल ट्रेनिंग देण्यात आली. ही ट्रेनिंग देणारा पोलिसांच्या रडारवर आला आहे. एक तयार स्क्रिप्ट वाचून दाखवली जायची. नागरिकाने प्रतिप्रश्न केला तर त्याला असे उत्तर द्यावे याचेही कौशल्य या तरुणांना दिले होते.

या टोळीचा प्रमुख जॉन नावाचा व्यक्ती ऑनलाईनद्वारेच फारूकीसोबत संपर्कात होता. तोच अमेरिकेतील व्यक्तींचा डेटा मिळत होता. व्हॉट्सॲप कॉलद्वारे फारूकी जॉनशी संपर्कात असायचा. या संपूर्ण गोरखधंद्यात ४५ टक्के वाटा जॉनचा, तर उर्वरित ५५ टक्के फारूकी आणि टोळीचा होता. मात्र, हा जॉन नेमका आहे कोण? तो कुठे आहे याचा शोध घेण्याचे पोलिसांसमोर आव्हान असणार आहे.

अमेरिकेत न्यायालय, तपास यंत्रणांची तेथील नागरिकांना प्रचंड भीती आहे. याचाच फायदा घेऊन ही टोळी नागरिकांना तुम्ही टॅक्स चोरी केल्याने तुमच्यावर कारवाई होणार आहे अशी न्यायालयाची बनावट नोटीस पाठवून



अगोदर भीती घालत. त्यानंतर त्याचा परत कॉल येताच यातून बाहेर पडण्यासाठी पैसे कार्डद्वारे भरण्यास सांगून ही रक्कम टोळीचे भामटे लुटायचे. यासाठी हायटेक यंत्रणाचा वापर करण्यात येत होता.फारुकी मूळचा उत्तर प्रदेशचा असून तो गेल्या १२ वर्षांपासून गारखेडा परिसरात स्थायिक आहे. मात्र, तो सायबर भामट्यांच्या संपर्कात आल्यानंतर तो परराज्यात व परदेशात जाऊन जाळे विणू लागला. गुजरातच्या गुंतवणूकदारांना हाताशी धरून त्याने अमेरिकन लोकांची फसवणूक करण्याचा डाव आखला. पश्चिम बंगाल येथील हॅकर्सच्या मदतीने जॉनच्या संपर्कात आला. डेटा मिळत गेल्याने कॉल सेंटरचा खेळ त्यांना जमून गेला, अशी माहिती सूत्रांनी दिली.





बीड : बीड शहरातील सबा ऑप्टीक्लसचे मालक हाजी अब्दुल मजीद यांचे लहान बंधू हाजी मोमीन जावेद यांचे चिरंजीव मोहंमद आबीद यांचा लग्न सोहळा आज कोहिनुर लॉन्स येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी नवरदेव मोहंमद आबीद यांना लग्नाच्या शुभेच्छा देतांना कृष्णा हॉस्पिटलचे संचालक डॉ.मनोज मुंडे, एमआयएमचे जेष्ठ नेते हाजी अब्दुल सलाम शेठ, अब्दुल मजीद शेठ, जावेद शेठ, शेख अय्युब अहेमद, कश्मकश - दिव्य वार्ताचे संपादक मोहंमद अबुबकर सह आदी.

# पैठण उबाठा शिवसेना गटाची बैठक संपन्न
# जिल्हा परिषदेवर भगवा फडकविण्याचा निर्धार



पैठण, (दिव्य न्युज):- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पैठण विधानसभा मतदारसंघातील जिल्हा परिषद व पंचायत समिती इच्छुक उमेदवाराची आढावा बैठक आज शुक्रवार रोजी पैठण शहरातील आशिर्वाद मंगल कार्यालय येथे पैठण विधानसभा मतदारसंघातील ९ जिल्हा परिषद व १८ पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुक २०२५ च्या इच्छुक उमेदवारांची आढावा घेण्यात आली. यामध्ये जिल्हा परिषदेच्या ९ गटासाठी ४० इच्छुक नावे तर पंचायत समितीच्या १८ गणा साठी ६७ जनांनी उमेदवारी मागितली.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हा प्रमुख तथा पैठण विधानसभा मतदारसंघाचे नेते दत्ताभाऊ गोर्डे डॉ.सुनील शिंदे प्रल्हाद औटे जेष्ठ शिवसैनिक शेष नारायण महाराज सुदाममामा होले सुरेश शेळके युवासेना प्रमुख शुभम पिवळ कीशोर वैद्य रावसाहेब दादा आडसुळ सोमनाथ जाधव सुरेश दुबाले शहरप्रमुख अजय परळकर तस्लीमा शेख अनिस पटेल नकुल मुळे आप्पासाहेब गायकवाड प्रविण शिंदे बद्रीनाथ गोर्डे आप्पासाहेब सोलाट संभाजी राजे अत्रे प्रविण शिंदे सुनील त्रिभुवन विकास नागे श्रीराम नागे स्वप्निल क्षिरसागर अशोक नागे प्रकाश बनसोडे गोकुळ घनवट जमादार भाइ कृष्णा शिंदे उद्धव क्षिरसागर भगवान कबाडी सह पदाधिकारी कार्यकर्ते शिवसैनिक उपस्थित होते...!

पान १ वरून

## डॉ.संपदा मुंडे प्रकरण

बीडच्या लेकीला न्याय मिळाला पाहिजे. मी फलटणला जाणार, माध्यमांसमोर याची चौकशी झाली पाहिजे अशी मागणी करणार आहे. कोणता लोकप्रतिनिधी यात होता, न्याय मिळेपर्यंत स्वस्थ बसणार नाही,

असे सोनवणे यांनी म्हटले. तसेच, मृत महिलेला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणाऱ्या महिला आयोगाच्या पत्रकार परिषदेवर देखील सोनवणे यांनी टीका केली.

पंकजा मुंडेंना २ वर्षानंतर आठवण झाली

पंकजा मुंडे यांना बाद झालेल्या मताची दोन वर्षानंतर आठवण आली. राज्यात तुमचे सरकार होते, भाऊ पालकमंत्री होता आणि तुम्ही असं म्हणता. दोन लाख मत बोगस झाले? पण वही होता जो मंजुरे खुदा होता है... त्यांच्याच यंत्रणेवर त्यांचा भरोसा नाही, या गोष्टीचा खेद वाटतो, असे म्हणत पंकजा मुंडे यांनी बोगस मत संदर्भाने केलेल्या आरोपावर उत्तर देताना म्हटले.

## पोटच्या गोळ्यासाठी

तात्काळ अटक करण्यात यावी, या खून प्रकरणातील मास्टरमाईंड गणेश शिराळे याच्यावर गुन्हा नोंद करत तात्काळ अटक करणे, घटनास्थळी हजर असणारे व आरोपींना मदत करणाऱ्यांना सह आरोपी करावे, या प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करावी, हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्यात यावे, सर्व आरोपींची नार्को टेस्ट करण्यात यावी या मागणीसाठी मनसेच्या वतीने पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. याच मागणीसाठी दि. ३ नोव्हेंबर रोजी भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या आंदोलनात वर्षा जगदाळे आदी पदाधिकारी या आंदोलनात सहभागी झाले होते.

## धूम-स्टाईल

हिसकावल्याचे गुन्हे दाखल होते. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी जिल्ह्यातील चोरी व जबरी चोरीचे गुन्हे उघड करण्याचे आदेश दिले होते.त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि सुशांत सुतळे यांच्या पथकाने सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक तपास केले. दरम्यान विश्वसनीय माहिती मिळाली की दोन्ही आरोपी नविन थर्मल कॉलनी, परळी येथे चोरीचे सोने विक्रीस येणार आहेत.

पथकाने सापळा रचून स्पोर्ट बाईकवर आलेल्या दोघांना थांबवून ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी नावे गुलामरज्जा मजलुम सय्यद वय २६ आणि मुस्लीम नासेर वेग वय ४३ दोन्ही रा. लोणी काळभोर, ता. हवेली, जि. पुणे सध्या हमु ईराणी गल्ली, परळी अशी सांगितली.त्यांच्या ताब्यातून माजलगाव येथील चोरीतील २४ ग्रॅम सोन्याची बोरमाळ (किंमत अंदाजे १.२५ लाख रुपये), परळी येथील गुन्ह्यातील ४.५ ग्रॅम सोन्याचा गंठण तुकडा (किंमत अंदाजे ५० हजार रुपये) तसेच गुन्ह्यात वापरलेली स्पोर्ट बाईक चक-०५----०८२६ असा एकूण २.९५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.दोन्ही आरोपी व मुद्देमाल परळी शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. या कारवाईत अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांचे मार्गदर्शन होते. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील सुशांत सुतळे, मारूती कांबळे, रामचंद्र केकान, विष्णु सानप, गोविंद भताने आणि सचिन आंधळे यांनी ही कामगिरी केली.

## रूपाली पाटील ठोंबरेंच्या

केलेलं आहे. त्यांची बहीण प्रिया पाटील या सगळ्यांनी मिळून हे सर्व कारस्थान केलं आहे सर्वांनी याची दखल घ्या, असेही मारहाण झालेल्या महिलेने व्हिडिओमध्ये म्हटलं आहे.

तर राष्ट्रवादी नेत्या रूपाली पाटील ठोंबरे यांच्याशी एबीपी माझाने संपर्क साधला असता मात्र त्या त्यांच्याशी अद्याप संपर्क होऊ शकलेला नाही. यासंदर्भात मी बीड वरून पुण्याला येत आहे असं रूपाली ठोंबरे यांनी सांगितलं आहे. कदाचित माझ्या आत्म्याने त्यांना मारहाण केली असेल असं रूपाली ठोंबरे पाटील यांनी म्हटलं आहे. मारहाणीच्या आरोपावर रूपाली ठोंबरे यांनी स्पष्टीकरण दिलं आहे, मात्र यासंदर्भात त्यांच्याशी संपर्क होऊ शकलेला नाही. तर रूपाली ठोंबरे पाटील यांनी एका व्हिडिओमध्ये म्हटलं आहे, मी बीडमध्ये आहे. बीडमधून मी आता पुण्याला येत आहे. मग बहुतेक माझ्या आत्म्याने तिला तिथे येऊन बदडलं असेल, घरातल्या कोणी का मारलेलं आहे? काय वाद झाला आहे? या सगळ्याचा कोणताही तपशील माझ्याकडे नाही. याबाबत इतकंच कळलं आहे की, दोन्ही पार्ट्या पोलीस स्टेशनला आहेत. दोघेही एकमेकांच्या विरोधात तक्रार देत आहेत. काय तक्रार देत आहेत? कशाबाबत तक्रार देत आहेत? काय झालेलं आहे? याची मी निश्चित माहिती घेऊन सांगेन, सगळ्या माध्यमांना संपूर्ण महाराष्ट्राला मी माहिती घेऊन सांगेन.

इथे कोणाचा काय वाद झाला आहे? कोण गंभीर आहेत? खंडाळकर कोण आहेत? माझ्या घरचे कोण आहेत? काय वाद झाला आहे? त्याची माहिती मी घेईन, दोन्ही पार्ट्या पोलीस स्टेशनमध्ये आहेत. एकमेकांविरोधात तक्रार देत आहेत, कोणाची चूक आहे ते समोर येईल, हा खुलासा फक्त मी बाहेर आहे बीडमध्ये आहे त्यामुळे देत आहे, असेही रूपाली पाटील ठोंबरे यांनी म्हटले आहे.राष्ट्रवादी शरद पवार गटाने या महिलेचा व्हिडीओ पोस्ट केला आहे, व्हिडीओसोबत लिहलं आहे की, रूपाली पाटील ठोंबरे यांच्या विरोधात पोस्ट टाकली म्हणून सदरील महिलेस (माधवी खंडाळकर) रुपाली ताई समर्थकांकडून अमानुष मारहाण करण्यात आली. त्येज्यामध्ये अजित दादांच लैच अवघड झालंय.या ठिकानी एका रूपाली ताईंना आवरायला जावं तर त्याठिकाणी दुसरी रूपाली ताई कांड करून ठेवायल्यात..! सार्वजनिक जीवनात काम करत असताना राजकीय जीवनात काम करत असताना दादांनी किती तो त्रास सहन करायचा म्हणावं त्याठिकाणी..!

## कदम डेअरी फार्ममधून

हजार रुपयांची रोकड लंपास झाल्याचे फिर्यादीने सांगितले.घटनेनंतर फिर्यादी आज दि. ३० ऑक्टोबर २०२५ रोजी पोलीस ठाण्यात हजर झाले आणि गुन्हा नोंदविण्यात आला. या प्रकरणी बीड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस हवालदार जाधव तपास करीत आहेत.

## मुख्यमंत्री माझी

यांनी स्पष्टीकरण दिले आहे. दोन कोटी पैसे थकल्याचे मला अजिबात वाटत नाही. त्यांनी जेवढे काम केले तेवढे पैसे त्यांना दिले, असे केसरकर यांनी सांगितले.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी आत्मीयता निर्माण होऊन, ते स्वच्छतादूत व्हावेत, यासाठी 'पीएलसी स्वच्छता मॉनिटर प्रकल्पा'ची कल्पना आर्या यांना सुचली. राज्य सरकारने त्यांच्या कल्पनेचे रुपांतर योजनेत करून त्यांना काम दिले. परंतु त्यांच्या कामाचा योग्य मोबदला न दिल्याने त्यांनी अनेक वेळा आंदोलने केली. अखेर १७ मुलांना डांबून ठेवून त्यांनी सरकारचे लक्ष्य आपल्याकडे आकृष्ट करण्याचा प्रयत्न केला. परंतु पोलिसांच्या झालेल्या चकमकीत त्याचा मृत्यू झाला.

तसेच रोहित आर्य याच्या दाव्यानुसार केसरकर यांनी अनेक भेटी टाळल्या. यावर त्यांना विचारले असता, भेटी नाकारल्याच्या बातम्या चुकीच्या आहेत. त्याला मदत केल्याचे माझ्याकडे पुरावे आहेत. पण सरकारी नियम तोडून तर पैसे देऊ शकत नाही. मला एवढेच पैसे पाहिजेत म्हणून त्यांनी हट्ट केला, असे केसरकर म्हणाले.

शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितल्यानुसार रोहित आर्यने पीएलसी स्वच्छता मॉनिटर प्रकल्प स्वखर्चाने राज्यातील शाळांमध्ये २०२२ मध्ये राबविण्यास सुरुवात केली. या प्रोजेक्टमुळे शाळांचा परिसर स्वच् राहू लागला. रोहित आर्यची दखल घेऊन शालेय शिक्षणमंत्री म्हणून केसरकर यांनी सरकारी निर्णय प्रसिद्ध केले. त्यानंतर हा प्रकल्प राबविण्यासाठी शिक्षण विभागाने २०२३ मध्ये काही प्रमाणात आर्थिक सहाय्य केल्याचे आर्या यांनी सांगितले. परंतु त्यानंतर केलेल्या कामाचे पैसे सरकारने दिले नाही. तब्बल २ कोटी रुपये थकविल्याचे त्याचे म्हणणे होते.

## रुपाली चाकणकर

तक्रारीत म्हटले आहे, की १९ ऑक्टोबरला सकाळी अकोले तालुक्यातील कोतूळ गावाजवळ पांगरी या छोट्या गावात एका तरुणाचा १५ वर्षांच्या अल्पवयीन मुलीबरोबर बालविवाह होणार असल्याची माहिती मिळाली.

आम्ही तातडीने पोलिस अधीक्षकांसह, संगमनेर येथील पोलिस उपविभागीय अधिकारी, अकोले तहसीलदार सिद्धार्थ मोरे, अकोले पोलीस निरीक्षक बोरसे यांना तसे कळवले. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने अकोले पोलिस ठाण्याला कारवाई करण्याचे आदेश दिले. परंतु त्यानंतर सकाळी लग्नविधी सुरू झाले.

अकोले पोलिस ठाण्यामधून संबंधितांना फोन केला गेला. जेवण रद्द करून तातडीने सारवासारव झाली. नवरीला तिथून दुसरीकडे हलवण्यात आले. नवरदेवाकडील व्यक्तींना अकोले पोलिस ठाण्यात बोलावून घेण्यात आले. त्यांच्याकडून पैसे घेतले गेले, असेही हेरंब कुलकर्णी यांनी तक्रारीत म्हटले आहे.

अल्पवयीन मुलीच्या आयुष्याचे नुकसान

एका अल्पवयीन मुलीच्या आयुष्याचे नुकसान होत असताना, ते रोखण्याचे सोडून अकोले पोलिस ठाण्यातील काही जण माहिती पुरवण्याचे काम करत आहेत, असा आरोपही त्यांना निवेदनात केला आहे. महिला आयोगाने अशा प्रकरणात लक्ष घालून पीडित महिलांना न्याय मिळवून दिला पाहिजे.

पोलिस यंत्रणा संशयाच्या भोवऱ्यात

फलटण इथले डॉक्टर युवतीच्या मृत्यू प्रकरणात देखील पोलिस यंत्रणा संशयाच्या भोवऱ्यात अडकली आहे. महिलांवर होणाऱ्या अन्यायात पोलिसच सामील होत असतील, तर दोषींवर कारवाईची अपेक्षा कुणाकडून करावी, असा प्रश्न यानिमित्ताने पुन्हा उपस्थित होत आहे. बालविवाह रोखण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते जीव धोक्यात घालून प्रयत्न करताना दिसतात.

पीडितांना न्याय हवा

परंतु पोलिस पाटील, कोतवाल तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यावरील जबाबदारीचे काय, असा प्रश्न देखील निर्माण झाला आहे. त्यातच महिला आयोगाने निष्पक्षपणे चौकशी करून दोषींवर कारवाई होण्यासाठी पाठपुरावा केला पाहिजे, तसेच पीडितांना न्याय मिळवून द्यावा, त्यांचे पुनर्वसन करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे.

## 'कोयता थांबला,

दिवसांपासून सुरू असलेल्या या पावसामुळे फळबागा, भाजीपाला आणि इतर पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.त्यात आता ऊसतोडणी थांबल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. सरकारने या वर्षी गाळप हंगामाची सुरुवात नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात करण्याचे निर्देश दिले असले तरी सध्याच्या हवामानामुळे तोडणी थांबल्याने गाळप उशिरा सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सध्या शेतांमध्ये पाणी साचून राहिल्यामुळे तोडलेला ऊसही शेतात पडून राहतो आहे. त्यामुळे ऊस सडण्याची शक्यता असून, शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.

पाण्याखाली गेलेल्या उसावर कीड व रोगराईचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, अवकाळी पावसामुळे ऊसतोड मजुरांचे हालही वाढले आहेत. हे मजूर पाचट, ताडपत्री किंवा कापडांच्या झोपड्यांमध्ये राहतात. पावसाचे पाणी झोपड्यांमध्ये शिरल्याने त्यांचे धान्य, कपडे, आणि इतर साहित्य भिजले आहे. काही मजुरांना झोपण्यासाठी ट्रॅक्टरखाली किंवा शाळांमध्ये आसरा घ्यावा लागत आहे.पावसामुळे तोडणी बंद झाल्याने मजुरांच्या रोजगारावर परिणाम झाला असून, रोजंदारी बंद पडल्याने त्यांच्या कुटुंबांना उपासमारीची वेळ आली आहे. जनावरांसाठी चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला असून, पावसात भिजलेल्या गुरांचे हाल पाहून मजुरांचे डोळे पाणावले आहेत. अवकाळी पावसाने ऊसतोडणीसह साखर हंगामावर विरजण घातले आहे. शेतकरी, कारखानदार आणि ऊसतोड मजूर हे तिघेही या पावसामुळे चिंतेच्या छायेत सापडले असून, कोयता थांबला, हंगाम लांबला ही परिस्थिती आता प्रत्यक्षात आली आहे.यंदा ऊसतोडणीस मजूर वेळेवर आले, त्यामुळे हंगाम सुरळीत सुरू होईल असं वाटत होतं; पण गेल्या काही दिवसांपासून पडणाऱ्या सततच्या अवकाळी पावसामुळे शेतात पाणी साचून जमीन चिखलमय झाली आहे. मजुरांना ऊस तोडता येत नाही, ट्रॅक्टरही शेतात उतरू शकत नाही, त्यामुळे कोयता पूर्णपणे थांबला आहे.